# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.११/२०२२** **दिनांक १८.१०.२०२२**
**स्थळ- जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ४.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व १००/२०२१ (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची विशेष सभा मंगळवार दि.१८/१०/२०२२ रोजी दुपारी ०४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२८०५/२०२२, दि.१४.१०.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.१८/१०/२०२२ रोजी दुपारी ४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

- **मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
  **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
  **अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
  **जिल्हाधिकारी अहमदनगर तथा**
  **सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.श्रीमती भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.**
  **मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा**
  **सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

**विषय नं.१** **दि.२६.०८.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५३१** **सदरचे निर्णय हे पुर्वीचे व्यवस्थापन समितीने घेतलेले असल्याने त्यांचे पुर्ण अवलोकन करणे गरजेचे आहे व आजचे सभेतील तातडीचे विषयांचा विचार करता तेवढा वेळ उपलब्ध नसल्यामुळे सदरचा विषय तहकुब ठेवण्यात आला.** **(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **दि.२७.०९.२०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५३२** **दि.२७.०९.२०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.** **(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.३** संस्थानचे मंदिर, प्रसादालय व लाडू निर्मिती विभागांसाठी गाईचे शुध्द तुप खरेदीकामी चौथी फेर ई-निविदेमध्ये प्राप्त न्युनतम दर मा.तदर्थ समितीचे सभेत माहितीस्तव सादर करणेबाबत.

**निर्णय क्र.५३३** सविस्तर चर्चा केली, सध्या संस्थानकडे १६८ क्विंटल तुप उपलब्ध आहे. असे सांगण्यात आले. खरेदीची ई-निविदा प्रक्रिया Manual for procurement of goods and Services in government department यामधील नियमावलीप्रमाणे पुर्ण केलेली नाही. तसेच शासनाचे दि.१ डीसेंबर,२०१६ चे शासन निर्णयाप्रमाणे पुर्ण केलेली नाही. उदा. खरेदीची तत्वे, घ्यावयाच्या तुपाची मानके याचा उल्लेख नाही. खरेदी करावयाचे तुप, विभागाची गरज व पुर्वानुभव लक्षात घेऊन तांत्रिक मानके व विनिर्देश निविदांमध्ये नमुद नाहीत. त्यामुळे या विषयातील निविदा तदर्थ समितीस मान्य करता आली नाही. ही बाब प्रशासकीय दृष्टया अयोग्य आहे.

दि.१.१२.२०१६ रोजीचे शासन निर्णय व वर उल्लेख केलेल्या नियमावलीचा अभ्यास करुन नवीन फेर प्रस्ताव समितीपुढे सादर करावा. सदर नियमावलीप्रमाणे ई-निविदा अटी व शर्ती न घालता ई-निविदा तयार करुन चार वेळा ई-निविदा काढण्यासाठी जो कोणी जबाबदार आहे. त्याचा खुलासा घेऊन पुढील अनुशासनात्मक कार्यवाही करण्यात यावी, जेणे करुन यापुढे अशी चुक होणार नाही. आणी ऐनवेळी तदर्थ समितीपुढे घाई गडबडीत प्रस्ताव आणू नये.

सध्याची गरज भागविण्यासाठी एक महिन्यासाठी लागणारा साठा व दिपावलीचा काळ लक्षात घेता अंदाजे १००० क्विंटल किंवा नोव्हेंबर-२०२२ अखेर पर्यंतचा साठा पुरेल या पैकी जे कमी राहील तो पर्यंत दि.१.१२.२०१६ रोजीचे शासन निर्णयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे स्विस चॅलेंज पध्दतीने खरेदी करणेची प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली. दरम्यान जीईएम पोर्टलमध्ये नोंदणी करुन घ्यावी व जीईएम पोर्टल मार्फत पुढील खरेदीसाठी प्रस्ताव तदर्थ समितीसमोर सादर करण्यात यावा.

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.४** संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पेपरकप खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत माहितीस्तव सादर.

**निर्णय क्र.५३४** सविस्तर चर्चा केली, प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे ई-निविदा प्रक्रिया राबवितांना पारदर्शता व मानके वैगरेचे पालन करुन प्रस्ताव सादर केल्याने असा विश्वास करुन प्रस्तावाला मान्यता देण्यात येत आहे. यापुढे सदर वस्तु खरेदी मध्ये जीईएम प्रणालीचा वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

दरवर्षीचा routine विषयापैकी आहे व खर्च आवर्ती आहे. यात धोरणात्मक विषय नाही म्हणून मा.उच्च न्यायालयाकडे सिव्हील ॲप्लीकेशन करण्याची आवश्यकता नाही.

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.५** संस्थानचे भांडार विभागासाठी कार्यालयीन जनरल स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त न्युनतम दर माहितीस्तव सादर करणेबाबत.

**निर्णय क्र.५३५** सविस्तर चर्चा केली, प्रस्तावावर चर्चा केली, A-4 साईज झेरॉक्स पेपर व लिगल साईज झेरॉक्स पेपर उदा. साठी ऑनलाईन दर पाहिल्यानंतर निविदामधील न्युनतम दर जास्तीचा आहे वर्षभरासाठी एकदम खरेदी करुन साठा करुन ठेवण्यापेक्षा निविदा किंवा जीईएम प्रणाली मार्फत दर निश्चीत करुन गरजेप्रमाणे मासिक किंवा त्रैमासिक कालावधीसाठी खरेदी करणे योग्य राहील.

या सर्व गोष्टींचा समावेश करुन नविन प्रस्ताव ठेवावा असे एकमताने ठरले. त्यामुळे हा प्रस्ताव मान्य करता येत नाही.

तातडीच्या वस्तु पाहिजे असल्यास विभागाकडून वस्तुंची गरज बोलावुन त्या गरजेची तपासणी/पडताळणी करुन महिन्याभरासाठी लागणारे साहित्य जीईएम प्रणालीव्दारे खरेदी होईपावेतो किंवा एक महिना या पैकी जे आगोदर घडेल तो पर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार क्षेत्रात कोटेशन मागवुन खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

**विषय नं.६** संस्थान व्यवस्थापनामार्फत सन-२०२३ (दि.०१ जानेवारी, २०२३ ते दि.३१ डिसेंबर, २०२३) अखेरचे कालावधीकरीता विविध प्रकारच्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करुन साईभक्तांना सशुल्क उपलब्ध करुन देणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांपैकी न्युनतम दराची ई-निविदा स्विकारणेबाबत.

**निर्णय क्र.५३६** सविस्तर चर्चा झाली, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. पुढील वर्षाचे प्रस्तावामध्ये एक वर्षासाठी निविदा बोलविण्यापेक्षा किमान दोन-तीन वर्षासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेचा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

दरवर्षीचा routine विषयापैकी आहे व खर्च आवर्ती आहे. यात धोरणात्मक विषय नाही म्हणून मा.उच्च न्यायालयाकडे सिव्हील ॲप्लीकेशन करण्याची आवश्यकता नाही.

(कार्यवाही- प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.७** संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नविन अद्ययावत तंत्रज्ञान युक्त HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम खरेदी करणेकामी पुनश्च: राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतंर्गातील वाणिज्यीक (Commercial bid) निविदेच्या अहवालाबाबत.

**निर्णय क्र.५३७** सविस्तर चर्चा झाली, प्रस्तुतचा प्रस्ताव नियमावलीस धरुन नाही. संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नविन अद्ययावत तंत्रज्ञान युक्त HMIS संगणकीय प्रणाली व PACS सिस्टीम खरेदीकामी पुन्हा विहीत नियमावलीचा आधार घेऊन नियमावलीप्रमाणे पुन्हा समिती समोर सादर करावा व ही प्रक्रिया जेवढया लवकरात लवकर होईल तेवढी लवकर करावी. सध्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.८** दोन्ही हॉस्पिटलकरीता संगणके, यु.पी.एस.प्रिंटर्स व सॉफ्टवेअर लायसेन्सेस खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतंर्गातील वाणिज्यीक (Commercial bid) निविदेच्या अहवालाबाबत.

**निर्णय क्र.५३८** सविस्तर चर्चा झाली, प्रस्तावास मान्यता देण्यात आली. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.९** एअर सर्किट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC) सन २०२२-२३ या वर्षासाठी देणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांमधील निम्नतम दर माहितीस्तव सादर.

**निर्णय क्र.५३९** सविस्तर चर्चा झाली, प्रस्ताव मंजुर.

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**विषय नं.१०** श्री साई प्रसादालयातील एअर व्हेंटीलेशन यंत्रणा व आय.टी.विभाग सर्व्हर प्रेसिजन ए.सी.यंत्रणा नवीन बसविणेकामी तांत्रिक सल्लागार नेमणुक करणेकरीता मे.अपुर्वा सर्व्हिस कन्सलटंट, ठाणे यांचे न्युनतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत माहितीस्तव सादर करणेबाबत.

**निर्णय क्र.५४०** सविस्तर चर्चा झाली, यासाठी तांत्रिक सल्लागार नेमणुक करण्याची गरज वाटत नाही. सदरचीयंत्राणा पुर्वीपासुन कार्यरत, अस्तीत्वात आहे. याकामी असलेल्या त्रुटीचा आढावा घेऊन त्याच प्रमाणे नविन गरजा लक्षात घेऊन ए.सी.यंत्रणा नवीन बसविण्याचे टेंडर काढु शकतो. त्यामुळे सदरचा विषय रद्द करण्यात येत आहे.

सबंधीत विषयातील संबधीत क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीचा पॅनल बनविण्यात यावा. उदा. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता, सिव्हील सर्जन किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी, शिक्षण क्षेत्रातील तज्ञ यांना संबधीत विषयावरील चर्चेसाठी बोलाविण्यात यावे. तसेच नामवंत शासकीय संस्था ज्या अशा प्रकारचे काम करतात किंवा त्यांना अनुभव आहे. अशा संस्थाच्या वरिष्ठ अधिकारी यांना चर्चेसाठी बोलण्यात यावे.

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.११** संस्थानचे सर्व भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे कॉम्प्रेहेनसिव्ह सर्व्हीसकॉन्ट्रॅक्ट तीन वर्ष कालावधी करीता देणेकामी ई-निविदेतील मे.फोनिक्स इलेव्हेटर्स (इं) प्रा.लि.पुणे यांचे निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे माहितीसाठी सादर.

**निर्णय क्र.५४१** सविस्तर चर्चा झाली, सन २०१६ चे शासनाचे खरेदी नियमावलीप्रमाणे स्विसप्रणालीचा वापर करण्यात यावा. सदरचा विषय अमान्य करण्यात आला.

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१२** दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी हॉलमध्ये वातानुकुलित (Air conditioner) यंत्रणा बसविणेकामी ई-निविदेतील मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे माहितीसाठी सादर.

**निर्णय क्र.५४२** सविस्तर चर्चा झाली, दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी हॉलमध्ये वातानुकुलित (Air conditioner) यंत्रणा बसविणेकामी अधिक स्पर्धात्मक व रास्त भाव मिळणेकामी जीईएम प्रणाली दर मागविता येतील म्हणून सदरचा प्रस्ताव मान्य करता येत नाही. जीईएम प्रणाली व्दारे सदरची प्रक्रिया राबविण्यात यावी.

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

विषय नं.१३ श्री साई प्रसादालयाकरीता नविन आटा युनिट खरेदी करणेकामी ई-निविदेतील मे.हिंदुस्थान ॲग्रो इंजिनिअरींग, वेरावल, गुजरात यांचे निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे माहितीसाठी सादर.

निर्णय क्र.५४३ सविस्तर चर्चा झाली, सन-२०१६ चे शासनाचे खरेदी नियमावलीप्रमाणे स्विस प्रणालीचा वापर करण्यात यावा. तो पर्यंत सदरचा विषय प्रलंबीत ठेवण्यात यावा.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)

---

विषय नं.१४ संस्थानचे अग्निशमन वाहन पार्किंगकरीता पत्राशेड उभारणी करणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराची निविदा माहितीस्तव सादर.

विषय नं.१५ संस्थानमार्फत करण्यात येणारे बांधकाम प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट पॅनलवर आर्किटेक्ट निवड करणेचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत.

विषय नं.१६ सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने खराब झालेल्या रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे खराब व चांगले डबे विक्री करणेकामी फेर ई-निविदा मागविणेबाबत.

विषय नं.१७ श्री साईबाबा महाविद्यालय – प्राध्यापकांना मुदतवाढ देणेबाबत.

विषय नं.१८ संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हरउपलब्ध करणेबाबत.

विषय नं.१९ संस्थानची नावे, बोधचिन्हे, अधिकृत वेबसाईट, प्रकाशने इ.चे Trademark व CopyRightबाबतची कार्यवाही करणेकामी या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.

विषय नं.२० श्री साईबाबा संस्थानचे नावाशी साम्य असणा-या वेबसाईटव्दारे देणगी जमा करणारे तसेच वेबसाईट, फेसबुक, इन्स्टाग्राम यावर साई नावाने असलेल्या अकाऊंटबाबत.

विषय नं.२१ संस्थान नियुक्त तांत्रिक सल्लागार M/s DSG Consultant Pvt.Ltd.Mumbaiयांचे प्राप्तअभिप्रायानुसार नविन दुरध्वनी यंत्रणेचे Service/Support बाबत तांत्रिक सल्लागार व पुरवठाधारक यांचेशी समक्ष चर्चा होऊन लेखापरिक्षणाच्या दृष्टीने प्रस्तावातील मुद्दा क्र."A" ते "G" प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.२२ ध्वनिक्षेपन यंत्रणा अद्यावतीकरणाचे निविदेसंबधीत कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभाग,मुंबई यांचेमार्फत करणेऐवजी संस्थानमार्फत सदरकामी तज्ञ सल्लागाराची नेमणूक ई-निविदा पध्दतीने करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.२३ श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत प्रकल्प साईभक्तांकरीता खुला करणेसाठी करावयाचेउपाययोजनांबाबत आर्किटेक्ट माथुर ॲण्ड कापरे असो., यांनी तयार केलेले सादरीकरण माहितीस्तव सादर.

विषय नं.२४ श्री साईबाबा शैक्षणिक संकुल (नवीन) औद्योगिक प्रशिक्षण संस्था व प्रसादालय या ठिकाणी एकुण११ नग नवीन रोलींग शटर्स तयार करुन बसविणेकामी येणा-या खर्चास तसेच याकामी दरपत्रके बोलाविणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.२५ श्री साईनाथ रुग्णालयात वाढीव खाटांसाठी व MJPJAY कार्यान्वीत करणेसाठी कर्मचारी उपलब्धता व त्यासाठीचे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय नं.२६ दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ चे आकृतीबंधासोबतच्या मंजूर परिशिष्ठ "अ" मध्ये नमूद असलेल्या वेतनश्रेणीनुसार संस्थान आस्थापनेवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने घेणेत आलेले कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन मिळणेबाबतचे अर्जावर निर्णय होणेबाबत.

| | |
|---|---|
| विषय नं.२७ | श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाकामी नियमावली व समिती गठीत करणेबाबत. |
| विषय नं.२८ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील रिक्त पदावर Ad-hoc पध्दतीने निदेशक नेमणूक करणेबाबत. |
| विषय नं.२९ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ इयत्ता १ ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्याशिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९(RTE Act-2009) अन्वये इयत्ता १लीचे एकुण १७६ नवीन प्रवेशानुसार २५% प्रमाणे ५९ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.३० | साईभक्तांना देण्यात येणा-या कॉट/लॉकर्स व अनुषंगीक सेवा पुरविण्याचे सेवा आकारामध्ये वाढ करणेबाबत. |
| विषय नं.३१ | अगरबत्ती विक्री करण्यासाठी स्टॉल लावणेस परवानगी मिळणेबाबत मा.सौ.शालीनीताई रा.विखे पाटील, विश्वस्त, जनसेवा, फौंडेशन, लोणी बु., ता.राहाता, जि.अहमदनगर यांचेकडील पत्र जा.नं.९३/२२, दि.२८.०९.२०२२. |
| विषय नं.३२ | संस्थानने संस्थान मालकीचे विविध ठिकाणी असलेल्या जागा/गाळे भाडेतत्वावर विविध संस्था/सोसायटी/ शासकीय कार्यालये यांना दिलेल्या मिळकतींचे चालू बाजारभावानुसार भाडे निश्चीत करणेबाबत. |
| विषय नं.३३ | श्री साईनाथ रुग्णालयातील सद्यिस्थतीला लागु असलेल्या वैद्यकीय सेवा आकारांच्या दरामध्ये वाढकरणेबाबत. |
| विषय नं.३४ | श्री साईबाबा रुग्णालयामध्ये नव्याने सुरु होणा-या कॅन्सर विभागामध्ये केमोथेरपी करीता आवश्यकअसणारे औषधे खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५८,४२,०१०/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.३५ | पिंच्याक सिलॅट (मार्शल आर्ट) राष्ट्रीय स्पर्धा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मध्येघेण्यासाठी परवानगी मिळण्याबाबत व त्या अनुषंगाने सुविधा मिळण्याबाबत. |
| विषय नं.३६ | श्री.शरद कचरु गोडगे, मदतनीस, बांधकाम विभाग यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत. |
| विषय नं.३७ | श्री. विजय तुकाराम मोकळ, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत. |
| विषय नं.३८ | श्री.शेखर विजयराव कुलकर्णी, सेवा निलंबीत सीसीटीव्ही ऑपरेटर, सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत. |
| विषय नं.३९ | संस्थानचे १२५ वाहने, विद्युत जनित्रे तसेच इतर विभागांना लागणारे इंधन पुरवठयाबाबत स्वयंपुर्ण होणेकरीता अंतर्गत इंधन व्यवस्था सुरु करणेबाबत. |
| विषय नं.४० | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकरीता स्कुल बस सेवा सुरु करणेबाबत. |
| विषय नं.४१ | सर्व न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने बाजू मांडणेकरीता वरिष्ठ वकिलांचे पॅनल तयार करणेसाठी पात्र अर्जदारांच्या मुलाखती घेणेबाबत. |
| विषय नं.४२ | संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.११,६३,९५८/- मात्र आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत. |
| विषय नं.४३ | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये जुलै-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.६२,३२,३५५/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.४४ | श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.६०,३७,०७४/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत. |
| विषय नं.४५ | श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑगस्ट-२०२२ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.९३,७७,७२०/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत. |

विषय नं.४६ मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छताविषयक साफसफाईची कामाची थकीत रक्कम रु.८.१७ कोटी मात्र आदा केलेचा प्रस्ताव अवलोकनार्थ सादर करणेबाबत.

विषय नं.४७ माहे जुन-२०२२ ते ऑगस्ट-२०२२ जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.

विषय नं.४८ संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम–२०१३ नुसार रजा, सुट्टया लागू केलेबाबत.

विषय नं.४९ शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाई परिक्षण अहवाल नोंद घेणेकामी सादर.

विषय नं.५० संस्थान वाहनांसाठी, विद्युत जनीत्रे तसेच इतर विभागांना लागणारे इंधन खरेदी कामी केलेल्याकार्यवाही बाबत.

विषय नं.५१ संस्थानचे माहे डीसेंबर-२०२१ ते जुन-२०२२ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप वखाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाबाबत.

निर्णय क्र.५४४ अजेंडयावरील विषय नं.१४ ते ५१ हे वेळेअभावी तहकुब ठेवण्यात आले. सदरचे विषय तदर्थ समितीचे दि.०२.११.२०२२ रोजीचे सभेमध्ये घेण्यात यावेत.

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा
विषय नं.१

निर्णय क्र.५४५ संस्थानकडे शिल्लक दैनंदिनी साठा किती आहे याची माहिती बोलविली १,०४,२३७ इतक्या दैनंदिनी शिल्लक आहेत व इतर साहित्य परिशिष्ठात नमुद केल्याप्रमाणे शिल्लक आहेत, अशी माहिती देण्यात आली. अंदाजे फक्त दोन महिने शिल्लक असल्यामुळे या दैनंदिनीची विक्री होणे शक्य नाही. त्यामुळे त्या वाया जाऊ नये म्हणून स्थानिक वर्तमान पत्रामध्ये तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर या दैनंदिनी घेण्यास कोणी तयार आहेत का व असल्यास कोणत्या दराने याबाबत जाहिर अवाहन करण्यात यावे, सदर अवाहनास एका आठवडयात प्रतिसाद न मिळाल्यास एक हजार रुपये किंवा त्यापेक्षा जास्त देणगीदारास देणगी पावतीसोबत एक दैनंदिनी व दिनदर्शिका (परिशिष्टातील क्र.६ वर दर्शविलेली) मोफत देण्यात यावी. स्टॉलवर दैनंदिनी रु.२०/- या किंमतीस विक्री करण्यात यावी. इतर साहित्य मुळ किंमतीच्या २५ टक्के दराने विक्री करण्यात यावे. स्टॉलवरील विक्रीचा अंदाज घेऊन दैनंदिनी शिल्लक राहिल्यास संस्थानचे विभागास शाळा, कॉलेज वगैरे यांना मोफत वाटप करण्यात याव्यात. असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

(कार्यवाही- प्रकाशने विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२

निर्णय क्र.५४६ उपरोक्त विषयांवर चर्चा करता, वरील विविध विषयांवर चर्चा करतांना वर्षभरासाठी कृती आराखडा, अल्पकालीन व दिर्घकालीन vision document याचा विचार केलेला नाही, व तरतुद केलेली नाही. तसा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

(कार्यवाही- सर्व विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **कर निर्धारण वर्ष २०१५-१६ चे CIT Appeal विरोधात ITAT Appeal दाखल करणेबाबत.**

**निर्णय क्र.५४७** **आय.टी.ए.टी.पुढे अपील दाखल करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यासाठी नियमानुसार देय असलेला कोर्ट फी स्टॅम्प देण्यास मान्यता देण्यात आली. अपीलात स्टे मिळविण्यासाठी त्या न्यायालयाचे आदेशाप्रमाणे शक्य झाल्यास बॅंक गॅरंटी अन्यथा रक्कम भरण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**वरील निर्णय क्र.५३१ ते ५४७ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ. ११.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

**स्वाक्षरीत/-**
**(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य,तदर्थ (Ad-hoc) समिती**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**स्वाक्षरीत/-**
**(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से)**
**जिल्हाधिकारी अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**स्वाक्षरीत/-**
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**